**<u>कालमर्यादा/आजच बाहेर</u>** **<u>जिल्हाधिकारी,गडचिरोली यांचे कार्यालय.</u>**

क्र./कार्या-२/आस्था-१/सिआर (०९)/५३७०/ ०९.
दिनांक - ३१ ऑक्टोबर २००९.

प्रति,

संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नागपूर - अमरावती विभाग,
नागपूर, जुने सचिवालय इमारत,
१ ला मजला, **नागपूर.**

विषय - जाहीरात वृत्तपत्रात प्रकाशित करण्या बाबत.

* * * *

सोबत जोडलेली जाहीरात खालील प्रमाणे वृत्तपत्रात प्रकाशित करण्यांत यावी, ही विनंती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुळ कार्यालयाचे नांव व पत्ता | :- | जिल्हाधिकारी,गडचिरोली |
| | दुरध्वनी क्रमांक | :- | २२२००१ |
| २. | जाहीरात प्रकाशित करावयाची शेवटची तारीख | :- | ०५ नोव्हेंबर, २००९. |
| ३. | प्रकाशित करण्याचा प्रकार | :- | विभागीयस्तर मराठी |
| ४. | संबंधीत काम असलेला जिल्हा | :- | जिल्हा गडचिरोली |
| ५. | जाहीरात करीता प्रस्तुत वृत्तपत्रे | :- | २ मराठी वृत्तपत्र |
| ६. | जाहीरात देयके कोणास सादर करावयाचे | :- | जिल्हाधिकारी,गडचिरोली |
| ७. | जाहीरात प्रत्येक वृत्तपत्रात किती वेळा प्रसिध्द द्यावयाची आहे. | :- | एक वेळा |
| ८. | संचालक, जाहीरात यांना वृत्तपत्रात | :- | -- |

सहपत्र /- जाहीरात २ प्रतीत

स्वा/-
**जिल्हाधिकारी,गडचिरोली.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल विभाग

जिल्हाधिकरी,गडचिरोली यांचे आस्थापनेवरील खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील रिक्त पदे भरती बाबत जाहीरात .

* * * * *

जिल्हाधिकारी,गडचिरोली यांचे आस्थापनेवरील वर्ग-३ (गट-क) संवर्गातील रिक्त पदे खालील अटिंच्या अधीन राहून खुल्या स्पर्धेमधून भरावयाची आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांनी त्यांची शैक्षणीक अर्हता (गुणपत्रीका प्रत्येक विषयात उत्तीर्ण झाल्याबाबत जोडाव्या ) जात वैधता प्रमाणपत्र/जात प्रमाणपत्र , अधिवास प्रमाणपत्र, जन्मतारखेचा दाखला, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन इत्यादी प्रमाणपत्रासह विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक २०.११.२००९ पर्यंत मागविण्यांत येत आहेत. दिलेल्या मुदतीनंतर ( दिनांक २०.११.२००९ नंतर ) प्राप्त होणारे (पोष्टाव्दारे प्राप्त अर्जासह) अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल, लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची शक्यतो त्याच दिवशी निवड यादी प्रसिध्द करण्यांत येईल.

**रिक्त पदे भरावयाच्या पदांचा तपशिल**

| अ. क्र | पदाचे नांव | वेतन श्रेणी | प्रवर्ग | एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला | अपंग | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | |
| १. | तलाठी | ५२००-२०२०० | अनु. जमाती | ३ | १ | -- | १ | -- | -- | १ |
| | | | भ.ज.(क) | १ | -- | -- | -- | -- | १ | -- |
| | | | वि.मा.प्र. | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | इ.मा.व. | १ | १ | -- | -- | -- | -- | -- |
| | | | खुला | ३ | १ | -- | -- | १ | -- | १ |
| | | | **एकुण** | **९** | **३** | **--** | **१** | **१** | **१** | **३** |
| २. | लिपिक टंकलेखक | ५२००-२०२०० | अनु. जाती | २ | १ | -- | -- | -- | -- | १ |
| | | | अनु. जमाती | ३ | १ | -- | १ | -- | -- | १ |
| | | | भ.ज. (ड) | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | वि.मा.प्र. | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | इ.मा.व. | २ | १ | -- | -- | -- | -- | १ |
| | | | खुला | १३ | ४ | -- | २ | १ | १ | ५ |
| | | | **एकुण** | **२२** | **७** | **१** | **३** | **१** | **१** | **१० (-१) अंध/अल्प दृष्टी** |

**टिप** - अपंगाचा आरक्षण हा (अंध/अल्पदृष्टी -१) प्रवर्गनिहाय आरक्षणात समाविष्ट आहे.

*  पदे अस्थाई असून पदांच्या एकूण व संवर्गनिहाय आरक्षित संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.
*  अस्थिव्यंग, जिचे अपंगत्व ४०% अगर त्यापेक्षा जास्त आहे.

**पात्रतेच्या अटी ( महत्वाच्या सुचना )**

**शैक्षणीक अर्हता** :-

१) **तलाठी संवर्गाकरीता** :- शैक्षणीक अर्हता अर्ज करतेवेळी किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

२) **लिपीक-टंकलेखक:-** संवर्गाकरीता शैक्षणीक अर्हता अर्ज करेतवेळी किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**व्यवसायीक अर्हता** :-

१) **तलाठी संवर्गांकरीता** :- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

२) **लिपीक-टंकलेखक संवर्गाकरीता :-** टंकलेखनाची मराठी किमान ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. शासन मान्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच संगणक अर्हता प्राप्त प्रमाणपत्र (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

**वयोमर्यादा :-**

जाहीरातीत नमुद केलेल्या दोन्ही पदांकरीता दिनांक ०५.११.२००९ रोजी किमान १८ वर्षे पुर्ण तसेच कमाल वय ३३ वर्षे आवश्यक. मागासवर्गीयासाठी ५ वर्षे शिथील करुन कमाल वय ३८ वर्षे आवश्यक राहील.

तसेच अपंग, माजी सैनिक व प्रकल्पग्रस्त यांचेकरिता दिनांक ०५.११.२००९ रोजी किमान १८ वर्षे व कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**अटी व शर्ती :-**

१) छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यातआले नाहीत. अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

२) उमेदवारांची २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावर प्रत्येकी ५० गुण याप्रमाणे प्रश्नपत्रिकेचे स्वरुप राहील. लेखी परिक्षेतील प्राप्त गुणवत्तेनुसार निवड यादी तयार करण्यांत येईल.

३ ) उमेदवारांना परिक्षेस येण्या जाण्याचा प्रवासखर्च दिला जाणार नाही .

४) अनुसूचीत जाती,अनुसूचित जमाती वगळून,विमुक्त जाती-अ,भटक्या जमाती-ब,क,ड, व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर ) तत्व लागू करण्यात आल्याने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५) जाहिरातीत दिनांक ३१ डिसेंबर, २००९ पर्यत सेवानिवृत्तीमुळे/ पदोन्नतीमुळे व इतर कारणामुळे रिक्त होणारी पदे दर्शविण्यात आलेली आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. तसेच सदरहू पदे जस जसे रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना जिल्हयात कुठेही देण्यात येईल. पदस्थापनेबाबत निवड झालेल्या उमेदवारानी पदस्थापनेबाबत/ स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.

६) उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा (अधिवास प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक).

७) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८) सदर पदांसाठी विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज करावे लागेल.

९) अपंगाचे आरक्षण शासन निर्णयानुसार राहील.

१०) लिपीक टंकलेखक व तलाठी या पदावर उमेदवाराची निवड लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्यांत येईल. पदाची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत समान गुण धारण करणा-या उमेदवाराच्या निवडीबाबत शासन निर्णयात दिलेल्या सुचनांच्या अधिन राहून निवड केल्या जाईल.

११) लिपीक टंकलेखक व तलाठी या पदाकरिता मौखिक परिक्षा घेतली जाणार नाही.

१२) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रद्य झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार,पदाची संख्या,समांतर आरक्षणातबाबत बदल करणे,परिक्षेला स्थगीत करणे व रद्य करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१३) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्य करण्यांत येईल.

१४) या जाहिरातील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

१५) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करित असेल त्या जाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावे. उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर नियुक्ती जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र तपासणीचे अधिन राहील.

१६)लेखी परिक्षेत पात्र ठरुन निवड झालेल्या उमेदवाराची यादी परिक्षा झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली येथील नोटीस नोटीस बोर्डवर तसेच www.Gadchiroli.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१७)उमेदवाराने यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालयाकडे/एकात्मीक आदिवासी प्रकल कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालय येथे नोदविले असेल तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.

१८) शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने अर्ज भरावा व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी. परवानगीशिवाय सादर केलेल्या अर्जाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार नाही. व तसे आढळल्यास त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यांत येईल.

१९) महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक/ ८२/२००१/मसेआ/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५ मे, २००१ मधील तरतुदीनुसार अधिन राहील.

२०)सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं.एसआरव्ही-२०००/१७/२०००/१२ दिनांक १.७.२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. ( अविवाहित उमेदवारांनीसुध्दा लागू नाही असे नमूद करुन सदर प्रतिज्ञापन स्वाक्षरी करुन  सादर करणे आवश्यक आहे.)

**भरती बाबत इतर आवश्यक सूचना :-**

१)  ज्यांना लिपीक-टंकलेखक व तलाठी या दोन्ही पदांकरीता अर्ज करावयाचा आहे,  त्यांनी एकच आवेदन पत्र भरणे आवश्यक असून त्यांनी अर्जातील अ.क्र. ५ समोर पदासाठीचा प्राधान्यक्रम नमुद करणे आवश्यक आहे.  आवेदनपत्रावर व लिफाप्यावर कोणत्या पदासाठी अर्ज आहे याचा उल्लेख करणे अनिवार्य आहे.

२)  सोबत दिलेल्या नमुन्यात ए-४ (३०x२९ से.मी.) आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला हस्तलिखीत/टंकलिखीत व चक्रमुद्रीत करुन अर्ज करावा.  उमेदवारांनी अर्जातील माहिती तपशिल सुस्पष्टपणे नमुद करावा.  उमेदवाराने ओळखपत्रातील छायाचित्राच्या आकाराचे त्यांचे अलिकडचे छायांकित आवेदन पत्रावर विहीत जागी घट्ट चिटकवावे. फोटो खाली योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.  शाळा सोडल्याचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र इत्यादीबाबत विहीत नमुन्यामध्ये माहिती भरुन पाठविलेली आवेदनपत्रे पुढील पत्यावर विहीत केलेल्या अंतीम तारखेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावीत. विहीत तारीख व वेळानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.  उमेदवाराने अर्जासोबत १० सेमी.x २२ सेंमी. आकाराचा स्वत:चा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) लिहिलेला व रु. ५/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफापा लेखी  परीक्षेत बसण्याच्या प्रवेश पत्रासाठी पाठवावा.  प्रत्येंक उमेदवाराने अर्ज हे डाक नोंद पोच देय  ( Registered Acknowledgment) स्पीड पोस्टव्दारे अगर कार्यालयातील टपाल शाखेत पाठवावे.  कुरिअर

सर्व्हीस सेवा व टपाल खात्याची दिरंगाई अथवा अन्य कोणतेही कारण असो, कोणत्याही परिस्थितीमध्ये वर नमुद केलेले अर्ज स्विकारण्याचा अंतीम दिनांक काटेकोरपणे पाळल्या जाईल.

३) **परिक्षा शुल्क :-** लिपीक -टंकलेखक व तलाठी पदाच्या परिक्षेकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये १५०/-व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये ७५/- इतके परिक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. परिक्षा शुल्क डी.डी. (Demand Draft) स्वरुपात **अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी गडचिरोली** यांचे नावांने राष्ट्रीयकृत बॅकेचा गडचिरोली येथे देय असलेला (Payable at Gadchiroli ) असणे आवश्यक राहील. सदर परिक्षा शुल्क हा ना-परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. परिपूर्ण अर्जासोबत परिक्षा शुल्क डी.डी.स्वरुपात जोडण्यात यावा.

४) **पत्र व्यवहाराचा पत्ता :- जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय, गडचिरोली - पीन कोड-४४२६०५**

भरतीबाबत इतर आवश्यक सूचना :-

१) अर्जदाराने अर्जासोबत प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात. दहावीची गुणपत्रीका जोडणे अनिवार्य आहे. ( उदा. शैक्षणीक पात्रता, गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीचे जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी ) मुळ प्रती जोडू नयेत.

२) अर्ज मोठया प्रमाणात प्राप्त झाल्यास लेखी परीक्षेसाठी अर्जाची छाननी करुन प्राप्त अर्जांचा विचार शैक्षणीक अर्हता प्राप्त उमेदवारांचे गुणवत्तेनुसार संक्षीप्त यादी तयार करण्यांत येईल. सदर यादीमधील मर्यादीत संख्येत पात्र उमेदवारास लेखी परीक्षेसाठी बोलविण्यांत येईल.

३) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहीत केलेल्या भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५) आरक्षीत पदांकरीता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

६) निवड केलेल्या उमेदवारांची गडचिरोली जिल्हयात ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

७) आवेदनपत्र स्विकृत/अस्विकृत करण्यास निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल, तसेच अंतीम निर्णय इत्यादीबाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती/नियुंक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.

८) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ) नियम- २००५ अन्वये विवाहित उमेदवारांनी त्यांचे अर्जासोबत दिनांक २८/३/२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्याबाबत विहीत नमून्यातील प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक राहील.

९) विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, विहीत नमुण्यात नसलेले अर्ज, मजकुर अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज व स्वाक्षरी नसलेले अर्ज, आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या सांक्षाकित प्रती जोडले नसेलेले अर्ज, मागासवर्गीयाच्या बाबतीत जातीचे प्रमाणपत्र नसेलेले अर्ज, विहीत शुल्क न भरलेले व फोटो नसलेले अर्ज, विहीत कालावधीत प्राप्त न झालेले अर्ज याप्रमाणे उणीवा असलेले अर्ज नाकारण्यात येईल.

स्वा/-

**( अतुल पाटणे )**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती, गडचिरोली.**